# शहर-उपनगर 'जवळीक' वाढणार



**मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेवरील ताण कमी करू शकतील असे सहा प्रकल्प आगामी काळात पूर्णत्वास जातील अशी अपेक्षा आहे. या प्रकल्पांमुळे पूर्व आणि पश्चिम उपनगरे तसेच नवी मुंबईपर्यंत अगदी कमी वेळेत प्रवास करता येईल. मेट्रोचे तीन प्रकल्प, पूर्व किनारपट्टीवरील जलवाहतूक, नवी मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करणार तसेच नवी मुंबईच्या विकासासाठी शिवडी-न्हावा शेवा ट्रान्स हार्बर लिंक, नरिमन पॉइंट ते बोरिवली कोस्टल रोड, मोनो रेल्वेचा दुसरा टप्पा या प्रकल्पांमुळे दैनंदिन प्रवास सुकर होण्यास कशी मदत होईल, यानिमित्ताने घेतलेला वेध!**

## मेट्रोच्या मार्गांमुळे शहर व उपनगरांमध्ये प्रवास सोयीचा

**जयंत होवाळ,** मुंबई
Jayant.howal@timesgroup.com

घाटकोपर ते वर्सोवा मेट्रो सुरू झाली आणि पूर्व उपनगरातून अगदी कमी वेळेत वर्सोव्याच्या दुसऱ्या टोकाला पोहोचणे अगदीच सुलभ झाले. परिणामी बस, रिक्षा किंवा खासगी वाहनांनी प्रवास करणाऱ्या अनेकांनी मेट्रोचा पर्याय आपलासा केला.

### ▶ दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द

या मेट्रो २मुळे हार्बरला राहणाऱ्यांना मुंबईचे दुसरे टोक असलेल्या दहिसरमध्ये अवघ्या ४० मिनिटांत पोहोचता येईल. मेट्रो २ने प्रवास करणाऱ्यांना घाटकोपर ते वर्सोवा दरम्यान जायचे असेल तर त्यांना डी. एन. नगर येथील मेट्रो १चा पर्याय उपलब्ध होईल. याचा अर्थ चेंबूरच्या व्यक्तीला वर्सोव्याला जाण्यासाठी प्रभावी पर्याय मिळेल. भायखळ्यापर्यंत यायचे असेल तर मोनो रेल्वेच्या वि. ना. पुरव स्टेशनचा पर्याय उपलब्ध होईल. रोज १६ लाख प्रवासी ही सेवा वापरतील असे सर्वेक्षण आहे.

### ▶ वडाळा-ठाणे-कासारवडवली मेट्रो

यामुळे वाहतूक कोंडीने गजबजलेल्या एल.बी.एस. रोडवरील वाहतुकीचा ताण कमी होईल. एलबीएस रोडवर प्रत्येकी एक किमी अंतरावर मेट्रोची स्टेशने असल्याने घाटकोपर ते थेट ठाणे तीन हात नाक्यावरील वाहतूक कोंडीतून सुटका होईल. झपाट्याने विकसित होत असलेला घोडबंदर रोडचा परिसर तसेच ठाणे शहराला मुंबईला जलदगतीने जोडण्याचे काम हा मेट्रो मार्ग करेल. रोज सात लाख प्रवासी ही सेवा वापरतील.

### ▶ कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ :

यामुळे नरिमन पॉइंट, वरळी, लोअर परळ व वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स यांसारखी वाणिज्य केंद्रे व आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय विमानतळे मेट्रोने जोडली जातील. रस्त्याशिवाय वाहतुकीचा अन्य पर्याय उपलब्ध नसलेल्या आणि उपनगरीय रेल्वे लांब अंतरावर असलेल्या काळबादेवी, प्रभादेवी, मरोळ आणि सीप्झ भागातील लोकांना मेट्रोचा आधार मिळेल. या मार्गांमुळे पश्चिम रेल्वेवरील भार काही अंशी कमी होऊ शकतो.

### ▶ मोनो रेल्वेचा दुसरा टप्पा :

चेंबूर ते संत गाडगे महाराज चौक, भायखळा सातरस्ता हा मार्गाचा दुसरा टप्पा पूर्ण झाल्यानंतर खऱ्या अर्थाने मोनोचा प्रभाव लक्षात येईल. वडाळा ते चेंबूर पट्ट्यात राहणाऱ्यांना दादर-नायगाव-भायखळ्याला जाण्यासाठी उपनगरीय रेल्वे वारंवार बदलावी लागणार नाही. लोअर परळसारख्या ठिकाणी मोनो रेल्वेला उपनगरीय रेल्वेची कनेक्टिव्हिटी मिळेल. त्या माध्यमातून मध्य रेल्वेवरील कोणत्याही स्थानकापर्यंतचा त्यांचा प्रवास सुकर होईल.

(पूर्वार्ध)